सकाळ पान क्र.1

दि. 20/03/2023

'समर्थन'चा अहवाल | विविध प्रकरणांच्या नोंदींत देशात राज्य चौथ्या स्थानावर

# देशातील नऊ टक्के गुन्हे महाराष्ट्रात

मुंबई, ता. १९ : राज्याच्या गृहविभागाच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणारा अहवाल समर्थन अध्ययन केंद्र या संस्थेने जारी केला आहे. देशात गुन्ह्यांच्या नोंदणीत राज्यांच्या यादीत महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर असल्याचे या अहवालाच्या आकडेवारीत समोर आले आहे. २०२१ मध्ये भारतीय दंडसंहितेअंतर्गत सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची देशांत सर्वाधिक ५,४०,८०० प्रकरणे महाराष्ट्रात नोंदली गेल्याची माहिती गृहविभागाच्या अर्थसंकल्पाच्या अहवालातून समोर आली आहे.

महाराष्ट्रात २०२१ मध्ये ५ लाख ४० हजार ८०० गुन्ह्यांची नोंद झाली असल्याचे अहवालात म्हटले आहे. २०२१ मध्ये भारतात ६० लाख ९६ हजार ३१० गुन्हे नोंदवले गेले आहेत. नोंदविलेल्या एकूण गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र ५ लाख ३० हजार ८०० इतके गुन्हे दाखल झाले असून महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रातील गुन्ह्यांचे प्रमाण ८.८७ टक्के आहे.




संबंधित वृत्त पान २

## मुंबईत २७ टक्के वाढ

अहवालानुसार २०२१ मध्ये मुंबई शहरात विविध अशा ६३,६८९ गुन्ह्यांची नोंद झाली. सर्वांत जास्त देशाच्या राजधानीत २.८९ लाख गुन्ह्यांच्या घटना नोंदवल्या गेल्या. मुंबईत दररोज सरासरीने किमान १७४ विविध प्रकारचे गुन्हे आयपीसी कलमांतर्गत नोंदवले गेले. आकडेवारीनुसार २०१९ आणि २०२०च्या तुलनेत २०२१ मुंबईत गुन्हेगारीत २७ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

## महिलाविरोधी गुन्ह्यांत तिसरा क्रमांक

- समर्थन संस्थेच्या अहवालातील आकडेवारीनुसार २०२१ या वर्षी देशातील महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे.
- अहवालानुसार २०२१ या वर्षी महिलांविरुद्ध एकूण ४,२८,२७८ गुन्हे नोंदवले गेले. त्यापैकी उत्तर प्रदेशात सर्वाधिक ५६,०८३ गुन्हे नोंदवले गेले. त्यानंतर राजस्थान ४०,७३८ आणि महाराष्ट्र ३९,५२६ गुन्हे नोंदवले गेले आहेत.
- महाराष्ट्रात रोज ११२ महिलांविरोधात अत्याचाराच्या घटनांची नोंद २०२१ मध्ये करण्यात आली. महानगरांत दिल्ली ३,९४८ नोंदणीकृत गुन्ह्यांसह आघाडीवर आहे, त्यानंतर मुंबई (१,१०३) आहे.

सकाळ पान क्र. 7

# एनआयएकडून पीएफआयच्या मुसक्या

## भारताला इस्लामी देश बनवण्याचा कट; १०५ जणांवर आरोपपत्र

नवी दिल्ली, ता. १९ (वृत्तसंस्था) : पीएफआय (पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया) या संघटनेवर बंदी घातल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांच्या मुसक्या आवळण्याची मोहीम राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) आणखी तीव्र केली आहे. भारताला २०४७ पर्यंत इस्लामी देश बनविण्याच्या हेतूने युद्ध पुकारण्याच्या कटाची पाळेमुळे एनआयए खणून काढत आहे. याप्रकरणी पाचवे आरोपपत्र दाखल करण्यात आले. १९ कार्यकर्त्यांविरुद्ध आरोप ठेवण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे यातील १२ जण पीएफआयच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य आहेत.

एनआयने दिल्लीत शनिवारी आरोपपत्र दाखल केले. अशी कारवाई झालेल्या पीएफआयच्या कार्यकर्त्यांची संख्या शंभरपेक्षा जास्त होऊन १०५ पर्यंत गेली आहे. बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्याखाली आरोपपत्र दाखल करण्यात आले.






### व्हीजन डॉक्युमेंट सापडले

पीएफआयच्या ट्रेनर्सना एक तर एनआयए किंवा विविध राज्यांच्या पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांप्रकरणी गजाआड करण्यात आले आहे. या कारवाईत पीएफआयचा ध्येयदृष्टी मसुदा (व्हीजन डॉक्युमेंट) जप्त करण्यात आला. त्यातून देशात इस्लामी राजवट आणण्यासाठी पैसा गोळा करणे, युवकांची दिशाभूल करणे, दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण देणे असा कट उघडकीस आला आहे.

### बिहारमध्ये एक हस्तक गजाआड

एनआयएने बिहारमध्ये पीएफआयच्या आणखी एका हस्तकाला रविवारी गजाआड केले. महंमद इर्शाद आलम असे त्याचे नाव आहे. तो पूर्व चंपारणमधील मेहसी गावचा रहिवासी आहे. फुलवाडी शरीफ येथून त्याला ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी बिहारमध्ये अटक झालेल्या संशयितांची संख्या आता १३ झाली आहे. सहा मार्च रोजी दक्षिण भारतात हवाला नेटवर्क उघडकीस आणून पीएफआयच्या पाच कार्यकर्त्यांना गजाआड करण्यात आले होते. त्यानंतर ही अटक झाली आहे.

पीएफआयचा चेअरमन ओमा सलमान, उपाध्यक्ष इ. एम. अब्दुल रहमान यांच्यासह राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य अनिस अहमद, अफसर पाशा, व्ही. पी. नझरुद्दीन, इ. अबुबकर, प्रा. पी. कोया, महंमद अली जीना, अब्दुल वाहिद सैत, ए. एस. इस्माईल, ॲड. महंमद युसूफ, महंमद बशीर, के. पी. शफीर आणि महंमद शकीफ यांचा समावेश आहे. राज्यांतील कार्यकर्ते वसीम अहमद, शाहीद नसीर, के. पी. जसीर, महंमद फारूक उर रहमान आणि यासर अराफत यांच्यावरही आरोपपत्र दाखल करण्यात आले.

### बँक खाती गोठविली

पीएफआयकडून परदेशातून तसेच भारतातून पैसा जमा केला जात होता. भारतात केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, तेलंगण, बिहार, राजस्थान,उत्तर प्रदेश, दिल्ली अशा राज्यांतून यासाठी प्रयत्न केले जात होते. पीएफआय संघटनेची ३७, तर त्यांच्या १९ कार्यकर्त्यांच्या नावांवारील इतर ४० खाती गोठवण्यात आली आहेत. त्यामुळे संघटनेच्या पैसा उभारण्यासाठीच्या कारवायांना जवळपास लगाम लागला आहे. विविध शहरांत ही कारवाई करण्यात आली. दिल्लीसह गुवाहाटी, सुंदीपूर (पश्चिम बंगाल), इंफाळ, कोझिकोड, चेन्नई, जयपूर, बंगळूर, हैदराबाद आणि कर्नुल या शहरांतील खात्यांचा छडा लावण्यात आला.

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि. 20/03/2023

सकाळ पान क्र.2




एक लाख लोकसंख्येमागे १६९ कर्मचारी

# राज्यात पोलिसांवर वाढता ताण

मुंबई, ता. १९ : राज्यातील लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध पोलिसांचा फौजफाटा अत्यल्प आहे. एक लाख लोकसंख्येमागे केवळ १६९ कर्मचारी उपलब्ध असल्याने राज्यात पोलिसांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. राज्याच्या गृहविभागाच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणारा अहवाल समर्थन अध्ययन केंद्राने जारी केला. त्यात ही माहिती पुढे आली आहे.

महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या अंदाजित १२ कोटी ४९ लाख एवढी असून २०२१ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष पोलिस संख्याबळ एक लाख ८७ हजार ९३१ आहे. म्हणजेच एक लाख लोकसंख्येसाठी १६९ पोलिस आहेत. महाराष्ट्रात महिला पोलिसांची संख्या ३१ हजार २३३ इतकी असून एकूण पोलिसांच्या तुलनेत ही संख्या १६.६१ टक्के इतकी आहे.




## अल्पवयीनांचे गुन्हेही आघाडीवर

अल्पवयीन मुलांकडून होणाऱ्या गुन्ह्यांच्या बाबतीत मुंबई यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२१ मध्ये मुंबईत अल्पवयीन मुलांनी केलेल्या ६११ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे, ज्यात चोरी आणि मारहाणीच्या अनेक प्रकरणांचा समावेश आहे.

राज्यात गुन्ह्यांची नोंद सर्वांत जास्त होते, हे खरे असले, तरी याकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे लागेल. कारण गुन्हे घडले, तर त्याची नोंद केली जाते. काही राज्यांत गुन्ह्यांची नोंदसुद्धा होत नाही.
- पी. के. जैन, माजी पोलिस अधिकारी

गुन्ह्यांच्या नोंदणीचे प्रमाण वाढले आहे, याचा अर्थ गुन्हेगारी निश्चित वाढली आहे; परंतु बरेचसे गुन्हे हे राजकीय आणि वैयक्तिक वैमनस्यामुळे नोंदवले जातात. - धनराज वंजारी, माजी पोलिस अधिकारी

सकाळ पान क्र.1

# राहुल गांधींच्या दारात पोलिस

## काँग्रेसचे सरकारवर टीकास्त्र

नवी दिल्ली, ता. १९ : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानी आज दिल्ली पोलिस पोहोचल्यावरून एकच गदारोळ झाला. काँग्रेसने या प्रकाराचा निषेध करताना केंद्र सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. पोलिसांना राहुल गांधींकडे पाठविणे हा छळाचा प्रकार असून हे हुकूमशाही सरकारचे भेकडपणाचे कृत्य असल्याचा प्रहार काँग्रेसने केला. मात्र राहुल गांधींनी केलेल्या उल्लेखाच्या आधारे लैंगिक शोषण झालेल्या पीडितांची माहिती घेण्यासाठी पोलिस कर्मचारी गेले असल्याचे दिल्ली पोलिसांकडून सांगण्यात आले.

राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यातील वक्तव्यावरून संसदेतील वातावरण तापले आहे. मागील आठवड्यात संसदेमध्ये काहीही कामकाज होऊ शकलेले नाही. असे असताना दिल्ली पोलिसांचे विशेष आयुक्त (कायदा सुव्यवस्था) सागर प्रीत हुड्डा अन्य सहकाऱ्यांच्या समवेत आज सकाळी राहुल गांधींच्या तुघलक लेनमधील निवासस्थानी पोहोचल्याने काँग्रेसमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटली. लैंगिक शोषण प्रकरणामध्ये पीडितांची माहिती घेण्यासाठीच ही भेट होती, असे पोलिसांनी सांगितले. राहुल गांधींना दिल्ली पोलिसांनी नोटीस बजावल्याची बातमी चर्चेचा विषय ठरली होती. त्यानंतर आज पोलिस आल्याचे कळताच राहुल यांच्या निवासस्थानी माध्यम विभाग सरचिटणीस जयराम रमेश, सरचिटणीस व विधिज्ञ अभिषेक मनू सिंघवी, राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत हे जाऊन पोहोचले होते.

» पान २ वर



नवी दिल्ली : राहुल यांच्या निवासस्थानाबाहेर पोलिस तैनात केल्याबद्दल निषेध करणारे काँग्रेसचे कार्यकर्ते.

### राहुल गांधी यांचे उत्तर

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पोलिसांच्या नोटिशीला ईमेलद्वारे प्राथमिक उत्तर दिले असून, अदाणींबद्दलच्या आपल्या वक्तव्यामुळे ही नोटीस बजावण्यात आली आहे काय, असा खोचक सवाल केला. सविस्तर उत्तरासाठी त्यांनी आठ ते दहा दिवसांची वेळ मागितली आहे.

## राहुल यांच्या दारात पोलिस

» पान १ वरून

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी, पोलिसांना पाठविण्याचा प्रकार म्हणजे अदानींच्या बचावासाठी 'जेपीसी'च्या मुद्यावरून लक्ष विचलीत करण्याचा आहे, असा आरोप केला. तर, जयराम रमेश, अशोक गेहलोत आणि अभिषेक सिंघवी यांनी काँग्रेसच्या मुख्यालयात पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारवर कडाडून टिका केली. मोदी सरकारने कितीही वाचविण्याचा प्रयत्न केला तर आम्ही अदानींवरून सवाल विचारत राहू. 'भारत जोडो यात्रेच्या ४५ दिवसांनंतर पोलिस राहुल गांधींकडे कसे जाऊ शकतात? हे भ्याडपणाचे कृत्य आहे. दिल्ली पोलिसांना महिलांची एवढी चिंता होती तर फेब्रुवारीतच त्यांनी विचारणा का नाही केली?,' असा सवाल जयराम रमेश यांनी केला.

CamScanner
Scanned with CamScanner

सकाळ पू. पान क्र. 3

दि. 20/03/2023

# पालिकेच्या नाळे तलावातून मत्स्यचोरी

## वसई-विरार महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान; कारवाईची मागणी



**विरार :** प्रभाग समिती 'ई'मधील नाळे तलावातील माशांचा चोरी होत आहे.

विरार, ता. १९ (बातमीदार) : सध्या महापालिका हद्दीतील वस्तूची चोरी होण्याचे प्रमाण वाढले आहे. आता पालिकेच्या तलावातील मासेही चोरले जात असून याची पालिकेला माहितीच नसल्याचे समोर आले आहे. विरार- वसई-विरार महापालिका प्रभाग समिती 'ई'अंतर्गत येणाऱ्या नाळे तलावातून मोठ्या प्रमाणात मत्स्यचोरी होत असल्याच्या तक्रारी असून, या चोरांवर पालिकेने तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील रहिवाशांची आहे.

वसई-विरार महापालिकेचे नऊही प्रभागांत एकूण १०४ तलाव आहेत. यापैकी ५९ तलाव मत्स्यसंवर्धन आणि जतन यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार होते. वसई-विरार महापालिका क्षेत्रातील मासेमारी संघटना आणि मच्छीमार संस्था यांना रोजगार उपलब्ध व्हावा, हा उद्देश या मागे होता. त्यानुसार वसई-विरार महापालिका प्रभाग समिती 'ई' कार्यक्षेत्रातील आठ तलाव वसई-विरार महापालिकेच्या वतीने मत्स्यसंवर्धनाकरता ठेंका पद्धतीने देण्यात येणार होते. यात डोंगरी मोडी तलाव, भोलाव तलाव, इंद्राणी वराळे तलाव, नाळे मोठा तलाव यासोबतच कोरलमान, कोरला, तळपा, खुटलई या तलावांचा समावेश होता. सध्या या तलावांतून असलेले मासे चोरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. नाळे तलावात दिवसाढवळ्या अशाप्रकारच्या चोऱ्या होत असल्याच्या परिसरातील रहिवाशांच्या तक्रारी आहेत.

तलावातून मासेचोरी होत असल्याची कल्पना नाहीड; पण तलावाच्या सुशोभीकरणाचा ठराव झालेला आहे. अधिक माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल.
- **नीता कोरे**, प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती-ई

सकाळ पू. पान क्र. 2

# खैरपाडा येथील तोडक कारवाईविरोधात श्रमजीवी संघटना आक्रमक

विरार (बातमीदार) : वसई विरार महानगरपालिका हद्दीतील खैरपाडा कणेर नालेश्वर येथील बांधकाम तोडल्याच्या विरोधात श्रमजीवी संघटना आक्रमक झाली आहे. यासंदर्भात श्रमजीवी संघटनेच्या कार्याध्यक्षा स्नेहा दुबे - पंडित यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने वसई तहसीलदार उज्ज्वला भगत यांची भेट घेतली. शासकीय जमिनीवर अनधिकृत बांधकामे सुरू असताना त्या भागातील मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक काय करत होते. सरकारी जमिनीवरील होणारी अवैध बांधकाम थांबविण्याची तसेच त्या जमिनीचे संरक्षण करण्याची जबाबदारी पार न पाडणाऱ्या सर्वांवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच शासकीय जागेवर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या भूमाफियांवर गरिबांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी या वेळी शिष्ट मंडळाने तहसीलदारांकडे केली. यावर संबंधित बेकायदेशीर बांधकाम प्रकरणात चौकशी करून पोलिसांना कारवाई करण्याचे आदेश देण्याचे आश्वासन तहसीलदारांनी दिले. या शिष्टमंडळात श्रमजीवी संघटनेच्या स्नेहा दुबे-पंडित यांच्यासह पालघर जिल्हा अध्यक्ष सुरेश रेंजड, पालघर जिल्हा सचिव तसेच जिल्हा परिषद सदस्य गणेश उंबरसाडा, जिल्हा उपाध्यक्ष रामा रोज, वसई तालुका अध्यक्ष आत्माराम ठाकरे, वसई सचिव एकनाथ कलिंगडा व दिलीप लोंढे आदी उपस्थित होते.

CamScanner
Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र.५

दि. 20/03/2023

म. टा. पृ. पान क्र.1

# मीरा–भाईंदरमध्ये काँग्रेसचे 'हाथ से हाथ जोडो' अभियान



**मीरा रोड ।** देशात गेल्या ९ वर्षाच्या मोदी सरकारच्या राजवटीत महागाईने उच्चांक गाठला आहे, बेरोजगारी वाढली आहे, जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीवर जीएसटी लावून महाग केल्याने सर्वसामान्य नागरिकांना जगणे अवघड झाले आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला आदींसह सर्व घटक भाजपच्या कारभारावर नाराज असल्याचे सांगत काँग्रेसकडून राज्यपातळीवर 'हाथ से हाथ जोडो' अभियान सुरू करण्यात आले आहे.

या अभियानावेळी भाजपवाले दोन उद्योगपतींसाठी देश चालवत असून, गोरगरीब जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा यशस्वीपणे पार पडल्यानंतर आता प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार मुझफ्फर हुसेन यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांच्या नेतृत्वाखाली मीरा-भाईंदर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने प्रत्येक ब्लॉकमध्ये २ ते ३ रॅली काढण्यात येणार आहे. भाजपच्या कारभाराची पोलखोल चौकसभा घेऊन केली जात आहे. हे अभियान दोन महिने चालणार आहे. राज्य निरीक्षक व प्रदेश सरचिटणीस भावना जैन, आनंद सिंह, माजी उपमहापौर सय्यद नुरजहाँ हुसैन यांच्यासह पक्षाचे नगरसेवक, ब्लॉक अध्यक्ष, महिला, युवक काँग्रेसचे पदाधिकारी पदयात्रेत सहभाग घेत आहेत.

उत्तन, भाईंदर पश्चिम, पूर्व, नयानगर, शांतीनगर, हटकेश, मीरा रोड, काशिमीरा आदी ८ ब्लॉकमधील विविध भागांत २४ प्रचार फेरी व चौकसभा घेऊन काँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष, स्थानिक पदाधिकारी, नगरसेवक पायी फिरून पत्रके वाटून जनतेशी थेट संवाद साधत असून, या अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पक्ष प्रवक्ते व प्रदेश प्रतिनिधी प्रकाश नागणे यांनी सांगितले.

## हत्येचा आरोपी सात वर्षांनी अटकेत

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरमध्ये एका हत्येच्या प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला तब्बल सात वर्षांनी उत्तर प्रदेशमधून अटक करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर पोलिसांच्या गुन्हे शाखेने ही कामगिरी केली.

मिरा रोडच्या नया नगर परिसरात रईस रोशन अन्वर हुसेन याची २०१६ साली हत्या झाली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास केला असता, शानु कालिया उर्फ शाहनवाज आयज अहमद, सोहेल शेख, नौशाद उर्फ अली इर्शाद शेख खान व असद अहमद सिद्दिकी यांनी पूर्ववैमनस्यातून ही हत्या केल्याचे समोर आले होते. त्यानंतर सिद्दिकी हा फरार झाला होता, तर इतर तीन आरोपींना अटक झाली होती.

त्यानंतर, मागील अनेक वर्षांपासून या हत्येच्या प्रकरणात फरार असलेला असद अहमद सिद्दिकी हा कौशंबी, उत्तरप्रदेश येथे राहत असल्याची माहिती मिरा-भाईंदर पोलिसांच्या काशिमिरा गुन्हे शाखेला समांतर तपास करत असताना सूत्रांकडून मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या एका पथकाने उत्तर प्रदेशमधून ४१ वर्षीय सिद्दिकी याला काही दिवसांपूर्वीच अटक केली.

सामना पान क्र.6

## भागीदाराने सराफाला लावला चुना

**वसई –** भागीदारीत सोन्याचा व्यवसाय करताना करोडो रुपयांची फसवणूक केल्याची घटना नालासोपारा येथे घडली आहे. तुळींज रोड येथील गंगोत्री गोकुळ टॉवर येथे राहणाऱ्या लक्ष्मीलाल जैन यांना महावीर ऊर्फ सनी जैन याने होलसेल सोने विक्रीच्या भागीदारीत व्यवसाय करू असे सांगत एक कोटी ८० लाखांना चुना लावला. तसेच नेमीचंद जैन, राजेश जैन व नितीन जैन यांचीही ३० लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात सनी जैनविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत पान क्र.3

## वाहनाखाली चिरडून श्वानाच्या पिल्लांचा मृत्यू

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** वाहनाखाली श्वानाच्या पिल्लांना चिरडून मारल्याप्रकरणी विरारमध्ये कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विरार पश्चिम बस स्टँड ते सबवेकडे जाणाऱ्या रस्त्यावर १६ मार्चला रात्री एकच्या सुमारास एका कार चालकाने रस्त्याच्या कडेला बसलेली मादी श्वान व तिच्या तीन लहान पिल्लांना धडक दिली होती. यात दोन पिल्ले चाकाखाली चिरडून जागीच ठार तर मादी श्वान जखमी झाली.

प्राणीमित्र प्रथमेश विजय जोशी यांनी शनिवारी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन आरोपी वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 20/03/2023

लोकमत पान क्र.3

# महामार्गावर अपघातात एकाचा मृत्यू, एक गंभीर

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : लग्नसमारंभाहून परतत असताना एका वाहनाच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. संतोष यशवंत नाईक (५७) असे मृत व्यक्तीचे नांव असून, ते विरारच्या उंबरगोठण परिसरात राहत होते.

विरार येथील संतोष नाईक, उद्देश राऊळ, विलास राऊळ, किशोर राऊळ व किशोरी राऊळ असे पाचजण सकवार येथून कारने घरी परतत होते. मध्यरात्री महामार्गावर कारचा टायर पंक्चर झाला. यावेळी कार चालवणारे संतोष नाईक व सोबत असलेले उद्देश राऊळ हे कारबाहेर आले. यावेळी पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. दोघांना पेल्हार येथील गॅलेक्सी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी संतोष नाईक यांना मृत घोषित केले, तर उद्देश राऊळ यांना गंभीर दुखापत झाल्याने मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात देण्यात आले आहे. मांडवी पोलिसांनी मोटर वाहन कायदा कलमाखाली आरोपी वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल केला.

पुढारी-पान क्र.4

# गोखिवरे सांडपाणी प्रकल्प विरोधात गावकरी आक्रमक

वसई : पुढारी वृत्तसेवा

वसई-विरार महानगरपालिकेचा प्रस्तावित सांडपाणी प्रकल्प गास ऐवजी गोखिवरे येथे सुरू करण्यात येणार असल्यामुळे गोखिवरे ग्रामस्थ कमालीचे आक्रमक झाले आहेत. हा प्रकल्प गोखिवरे गावात कोणत्याही परिस्थितीत येता कामा नये यासाठी गोखिवरे ग्रामस्थांनी कंबर कसली आहे.

गोखिवरे परिसर हा शेतीप्रधान परिसर असून येथील शेकडो एकर जमीन ही वनक्षेत्र म्हणून राखीव आहे. येथून जवळच जंगलदेखील आहे. गोखिवरे गावाजवळच राजावली, पेल्हार, बापाणे आदी शेतीप्रधान गावे आहेत. परिसरात एक मोठी खाडी असून या खाडीच्या माध्यमातून पावसाचे पाणी वसईच्या खाडीत जाते. हा भूभाग हरित पट्टा असून त्याचे सौंदर्य अबाधित राखणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. अशा या निसर्गरम्य परिसरात सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरू झाल्यास येथील स्थानिकांना दुर्गंधीत जगावे लागेल. येथे अनेक पिढ्यांपासून रहात असलेले गावकरी तसेच आदिवासी यांना मरणयातना भोगाव्या लागणार असून त्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची दाट शक्यता वर्तवली आहे.

पुढारी-पान क्र.5

# मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

मिरारोड : काशीमीरा पोलिस ठाणे हद्दीत स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्टेटस स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई केली आहे. यावेळी तीन पीडित मुलींची सुटका केली आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक समीर अहिराव यांना माहिती मिळाली की काशीमीरा पोलीस ठाणे हद्दीतील दहीसर चेकनका , पेनकरपाडा रोड, शिवानी लॉजिंग बोर्डिंग जवळ असलेल्या स्टेटस स्पा सेंटर मध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार सापळा रचून स्टेटस स्पा सेंटरवर छापा मारला. त्यावेळी स्टेटस स्पा सेंटरचे मॅनेजर व कॅशिअर ला ताब्यात घेऊन ३ पीडित मुलींची सुटका केली आहे. स्टेटस स्पा सेंटरचे मॅनेजर , कॅशियर मुलींकडून मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करून घेत होते. या स्टेटस स्पा सेंटर चे मुंबईत काही स्पा सेंटर असल्याचे सांगितले जात आहे. स्टेटस स्पा सेंटर चे चालक व मालक फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या स्पा सेंटरचे मॅनेजर , कॅशिअर , चालक व मालकावर काशिमिरा पोलीस ठाण्यात पिटा कायद्याच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडीत मुलींना महीला सुधार गृहात पाठवण्यात आले आहे. ही कारवाई गुन्हे शाखा काशिमिरा व अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष भाईंदर यांनी संयुक्तपणे केली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र.5

दि. 20/03/2023

# धीरेंद्र शास्त्रींच्या कार्यक्रमात चोरट्यांचा डल्ला

## एकाच दिवशी ३६ महिलांचे मंगळसूत्र चोरीला, ६ महिला अटकेत

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराज (बागेश्वर धाम सरकार, मध्यप्रदेश) यांचा सालासर सेंट्रल पार्क मैदान, मीरारोड पूर्व येथे १८ व १९ मार्च रोजी श्रीमती शांताबेन मिठालाल जैन चॅरीटेबल ट्रस्ट भाईदर पूर्व यांनी दिव्य दर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात होता. या कार्यक्रमात पहिल्या दिवशी चोरांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. पहिल्या दिवशीच तब्बल ३६ महिलांचे मंगळसूत्र, सोन्याच्या साखळी चोरीला गेल्याच्या घटना घडल्या आहेत. त्याबाबत मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी चोरी करणाऱ्या सहा महिलांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.



रविवारीही धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराजांच्या कार्यक्रमाला मुंबई, ठाणे, पालघर व इतर जिल्ह्यातून आलेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

### काही लोकांचे पर्स चोरीला

बागेश्वर धाम दरबारात आलेल्या व ज्यांचे दागिने चोरी झाले त्या महिलांनी सांगितले की, आमचा प्रश्न तर सुटला नाही, उलट आमच्या दागिन्यांची चोरी झाली आहे. तर काही लोकांचे पर्स चोरीला गेल्याचे सांगितले जात आहे.

धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराज (बागेश्वर धाम सरकार, मध्यप्रदेश) यांचा मिरारोड येथे दोन दिवसीय कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाला काही संघटनांनी विरोध केला आहे. या कार्यक्रमासाठी मुंबई, ठाणे, पालघर व इतर जिल्ह्यातून आलेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र नागरिक आल्यामुळे शहरात सगळीकडे वाहतूक कोंडी झालेली पाहायला मिळाली. तसेच कार्यक्रम ठिकाणी ठेवलेला पोलिसांचा बंदोबस्तही अपुरा पडला आहे. कार्यक्रम ठिकाणी नागरिकांनी गर्दी केल्यामुळे चेंगराचेंगरी झाली व नागरिक खाली पडून जखमी झाले आहेत. तसेच चोरांनी गर्दीचा फायदा घेत अनेक महिलांचे सोन्याचे दागिने चोरी केले आहेत.

शनिवारी रात्री उशिरापर्यंत मिरारोड पोलीस ठाण्यात ३६ महिलांनी त्यांचे दागिने चोरी झाल्याचे गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये महिलांचे मंगळसूत्र व सोनसाखळी चोरी झाली आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपास करून दागिने चोरी करणाऱ्या ६ महिलांना ताब्यात घेतले असल्याचे सांगितले आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत

# सोने भागीदारीच्या व्यवसायात फसगत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : भागीदारीत सोन्याच्या व्यवसाय करताना कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची घटना नालासोपारा येथे घडली आहे.

तुळींज रोड येथील गंगोत्री गोकुळ टॉवर येथे राहणाऱ्या लक्ष्मीलाल जैन (४९) यांची आरोपी महावीर ऊर्फ सनी भवरलाल जैन यांनी ३ मे २०२२ ते ६ मार्च २०२३ दरम्यान होलसेल सोने विक्रीच्या भागीदारीत व्यवसाय करू, असे सांगत ३ किलो ४०० ग्रॅम वजनाचे सोने अशी १ कोटी ८० लाख रुपयांची सोन्याची बिस्किटे घेतली होती. तसेच त्यांचा भाऊ नेमीचंद जैन, राजेश जैन व नितीन जैन यांच्याकडून ३० लाख रुपये आरटीजीएसने ऑनलाइन घेतले होते. भागीदारीत केशरीमल जैन यांचा मुलगा हितेश याला सोबत न घेता एकूण २ कोटी १० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शनिवारी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Mar 20, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# कार भाड्याने घेऊन फसवणूक

नालासोपारा : कार भाड्याने घेऊन लाखोंची फसवणूक केल्याची घटना वसईत घडली आहे. भास्कर आळी येथील न्यू व्यंकटेश अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या प्रसाद बाबुराव चौधरी (४३) यांची २ लाख ५ हजार रुपये किमतीची वॅगनार कार कल्याण येथील तुळशीराम सोनवणे यानी ओळखीचा फायदा घेऊन महिन्याला ठराविक भाडे देतो असे सांगत करार करून सोबत नेली होती. मात्र २२ डिसेंबर ते १८ मार्च दरम्यान ठरवलेले मासिक भाडे किंवा कार परत न देता त्यांची फसवणूक करण्यात आली. शनिवारी वसई पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

# बागेश्वर सरकार के दरबार को लेकर पुलिस की कड़ी नजर

**भायंदर :** मीरा भायंदर महानगरपालिका क्षेत्र के सेंट्रल पार्क मैदान में बागेश्वर धाम के धीरेंद्र शास्त्री महाराज के दो दिवसीय दरबार के दौरान मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय की कार्यक्रम को लेकर पुलिस कमिश्नर मधुकर पांडे के मार्गदर्शन में पुलिस की चप्पे चप्पे पर नजर रही। अपेक्षा से अधिक संख्या में श्रद्धालुओं के पहुंचने के बावजूद पुलिस डटी रही तथा पहले ही दिन का दरबार खूब सजा।



हालाकि राजनीतिक दलों द्वारा दरबार को लेकर लिए गए विरोध को लेकर प्रशासन ने भी कमर कसी तथा गैरकानूनी हरकत करने वालों से निपटने कड़ी सुरक्षा-व्यवस्था की गई। कार्यक्रम को लेकर 4 डीसीपी, 4 एसीपी और 100 से ज्यादा पुलिसकर्मियों के अतिरिक्त एस आर पी एफ की एक प्लाटून भी तैनात की गई। पहले दिन के दिव्य दरबार को लेकर कुछ लोगो की चेन और अन्य सामान चोरी किए जाने की भी खबर है।

Scanned with CamScanner

लोकमत

'डायल ११२' प्रणाली : नागरिकांना पोहोचवतात तत्काळ मदत

# मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : चोरी, घरफोडी, खून, बलात्कार, अपघात, हाणामारी, लूटमार अथवा कोणताही गुन्हा घडला की, सर्वप्रथम पीडितांना पोलिसांची आठवण येते. राज्य शासनाने अडचणीतील व्यक्तीच्या मदतीसाठी पोलिस तत्काळ घटनास्थळी पोहोचण्यासाठी ११२ ही डायल प्रणाली सुविधा अत्याधुनिक यंत्रणेसह नागरिकांच्या मदतीसाठी सुरू करण्यात आली होती. सन २०२२ मध्ये मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस दल अव्वल स्थानी होते. शुक्रवारी सकाळी पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी पर्यवेक्षण अधिकारी पोलिस उपनिरीक्षक राणा परदेशी यांचे नायगाव येथे अभिनंदन केले आहे.



पर्यवेक्षण अधिकारी पोलिस उपनिरीक्षक राणा परदेशी यांचे पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी अभिनंदन केले.

## २०२२ मध्ये साधारण ३५ हजार कॉल झाले होते प्राप्त

- मागील वर्षी जानेवारी ते डिसेंबर २०२२ आयुक्तालयात ३४ हजार ९८७ कॉल प्राप्त झाले होते. पोलिस दलाने साधारणपणे ७ मिनिटे ३४ सेकंदामध्ये नागरिकांना मदत पोहोचवली होती.
- त्यामुळे २०२२ साली पोलिस आयुक्तालय अव्वलस्थानी होते. फेब्रुवारी २०२३ मध्ये पोलिस आयुक्तालयाचा रिस्पॉन्स टाइम हा ४ मिनिटे ९ सेकंद असल्यानेही फेब्रुवारी महिन्यातही अव्वल स्थानी होते.

या डायल प्रणालीसाठी सहायक पोलिस आयुक्त विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी पोलिस उपनिरीक्षक राणा परदेशी, ६५ मार्शल आणि ९ डिस्पेचर उत्कृष्टपणे काम करीत आहेत.



Scanned with CamScanner